नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१६ Issue - 316 | वार मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ Blow- Tuesday Date 7 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com




# युध्दविरामाच्या प्रस्तावाला इराणने दाखवली केराची टोपली

## कुणालाही सोडणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : इराणने पाकिस्तानकडून मांडण्यात आलेल्या १५ मुद्द्यांच्या शांतता प्रस्तावाला नकार दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या एका प्रवक्त्याने सांगितले की, मध्यस्थांमार्फत पाठवण्यात आलेला अलीकडील शांतता प्रस्ताव इराणने फेटाळून लावला आहे. युद्धविराम ासंदर्भातील कोणतीही चर्चा इराणच्या राष्ट्रीय हितांचा विचार करूनच केली जाईल, अशी भूमिका तेहरानने पुन्हा स्पष्ट केली आहे.

वृत्तानुसार, पाकिस्तानने तयार केलेल्या मसुदा प्रस्तावाची प्रत इराण आणि अमेरिका (खीरप-णड-खी-ीरशश्र थरी) या दोन्ही देशांना पाठवण्यात आली होती. या प्रस्तावात युद्ध समाप्त करण्यासाठी ४५ दिवसांच्या युद्धविरामासह होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याचा प्रस्ताव होता. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बगाई यांनी सांगितले की, तेहराननने मध्यस्थांमार्फत आपली भूमिका आणि अटी यापूर्वीच स्पष्ट केल्या होत्या. कोणत्याही प्रकारच्या दबाव किंवा धमक्यांखाली इराण चर्चा करणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.



इस्माईल बगाई म्हणाले, डेडलाइन देणे आणि युद्धाची धमकी देणे हे चर्चेच्या प्रक्रियेशी सुसंगत नाही. तेहरानच्या काही अटी आहेत ज्या पूर्णपणे राष्ट्रीय हितांवर आधारित आहेत आणि त्यांना कोणत्याही तडजोडीचा संकेत म्हणून पाहू नये. त्यांनी पुढे सांगितले की, इराण आपल्या योग्य आणि न्याय्य मागण्या स्पष्टपणे मांडण्यास अजिबात कचरात नाही. याकडे तडजोड म्हणून नव्हे, तर आत्मविश्वासाच्या प्रतीक म्हणून पाहिले पाहिजे. तेहराननने अमेरिकेसाठी (खीरप-णड-खीरशश्र थरी) आपले राजनैतिक उत्तर तयार केले असून योग्य वेळी त्याची घोषणा केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अमेरिकेचे (खीरप-णड-खीरशश्र थरी) राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५ एप्रिल २०२६ रोजी आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत विधान करत, मंगळवार (७ एप्रिल २०२६) हा दिवस इराणमध्ये पॉवर प्लांट डे आणि ब्रिज डे असेल, असे म्हटले. हे विधान इराणमधील वीज प्रकल्प आणि पुलांवर हल्ल्याची अप्रत्यक्ष धमकी असल्याचे मानले जात आहे. ट्रम्प यांनी अमेरिका-इराण यांच्यात सध्या चर्चा सुरू असल्याचा दावा करत ६ एप्रिल रोजी करार होण्याची शक्यता चांगली असल्याचेही म्हटले.

# काँग्रेसला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असा पराभव करु; बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार दिल्याने भाजपचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधत आक्रमक भूमिका मांडली. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये. जर लढलीच तर त्यांचा असा पराभव करू की त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असा थेट इशारा त्यांनी काँग्रेसला दिला आहे. बावनकुळे यांनी अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाचा संदर्भ देत काँग्रेसला भावनिक साद घातली. अजित दादांचा बहुतांश राजकीय काळ काँग्रेससोबत गेला आहे. त्यांचे संबंध, सहवास आणि कामाचा इतिहास काँग्रेसशी जोडलेला आहे. त्यामुळे काँग्रेसने काही राजकीय संस्कार जपायचे असतील, तर त्यांनी बारामतीत निवडणूक लढवू नये आणि सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभं राहावं, असं ते म्हणाले. बारामतीतील विजयाबाबत त्यांनी मोठा दावा केला. आम्ही स्वतः बारामतीत जाऊन सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज भरू. बारामतीत ७५ टक्क्यांहून अधिक मतांनी विजय मिळवू. काँग्रेसचा आजवर कधीच झाला नसेल इतका मोठा पराभव येथे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शरद पवार यांच्या भूमिकेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. मात्र भाजपची भूमिका अगदी ठाम आहे. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये. दरम्यान, आज भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष संघटनाबाबतही त्यांनी महत्त्वाचे विधान केले. पक्षाचा विस्तार आणि बळकटीकरण हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पुण्यात आणि राज्यात, देशभरात भाजपचे संघटन ५१ टक्क्यांपेक्षा अधिक नेण्याचा संकल्प केला आहे. युवकांना मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडणार आहोत. राज्यभर संघटना मजबूत करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. अशोक खरात प्रकरणावर त्यांनी सावध भूमिका घेतली. हे प्रकरण संवेदनशील आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी माध्यमांसमोर यावर भाष्य करणं योग्य नाही. डखढकडून जे निष्कर्ष समोर येतील त्यानुसारच कारवाई होईल. जर अधिकारी दोषी आढळले, तर त्यांना बडतर्फ करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, अजित पवार यांच्या अपघातावर काँग्रेसकडून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवर त्यांनी पलटवार केला आहे, निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अशा मागण्या केल्या जात आहेत. मात्र बारामतीतील जनता सुनेत्रा पवारांना प्रचंड मतांनी विजयी करेल आणि काँग्रेसला मोठा धक्का बसेल, असा दावा बावनकुळे यांनी केला.

# 'पीएनजी' क्षेत्रातील नागरिकांना ३० जूननंतर 'एलपीजी' गॅस पुरवठा बंद; पर्यायी इंधन म्हणून केरोसीनचे वाटप होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी पीएनजी जोडणीसाठी येत्या ३० जूनपर्यंत अर्ज किंवा नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा



पुरवठा ३० जूननंतर बंद केला जाईल, असा इशारा राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला आहे. घरगुती आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या वापरकर्त्यांसाठी हे बंधनकारक असल्याचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांनी सोमवारी स्पष्ट केले. राज्यातील तेल उत्पादनांच्या पुरवठ्याबाबत माहिती देण्यासाठी मंत्रालयातील पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, उमेश कुलकर्णी (राज्य समन्वयक, तेल उद्योग) आदी उपस्थित होते. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर ताण असला, तरी राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा मुबलक आहे. इंधन टंचाईमुळे लॉकडाऊन लागणार असल्याच्या अफवा पसरल्याने मागील आठवड्यात रांगा लागल्या होत्या, मात्र आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे, असे डांगे यांनी सांगितले. सध्या दररोज १८ हजार ५०० किलोलीटर पेट्रोल आणि ४० हजार किलोलीटर डिझेलचे वितरण सुरू असून मागणी सरासरी इतकीच आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

वाढत्या मागणीला पर्याय म्हणून पीएनजी नेटवर्क गतीने वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यासाठी प्रलंबित अर्जांना २७ मार्च रोजी 'डीम्ड परवानगी' देण्यात आली असून महानगरपालिकांना २४ तासांच्या आत मंजुरी देण्याचे आदेश दिले आहेत. फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यात ४२.३० लाख पीएनजी कनेक्शन्स होती, ज्यात गेल्या एका महिन्यात ७३ हजारांची भर पडली आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

एलपीजी वितरणाबाबत नवे नियम -(पान ४ वर...)



## संपादकीय....

### चर्चेचे फलित?

इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष शांत होण्याचे नाव घेत नाहीये. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे होर्मूझ सामद्रधुनी सध्या जागतिक चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतालाही याचे थेट परिणाम जाणवू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी इराणकडून थेट संपर्क साधण्यात आला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी जयशंकर यांना फोन करून सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली. याचबरोबर कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यांच्यासोबतही भारताने संवाद साधला. मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर ही चर्चा महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मूझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ४८ तासांचा अल्टिमेटम दिल्याची माहिती समोर आली आहे. सामुद्रधुनी खुली केली नाही तर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आल्याचे सांगितले जाते. होर्मूझ सामुद्रधुनीत तणाव वाढल्यामुळे भारतासह अनेक देशांची जहाजे अडकली असल्याची माहिती आहे. ही ३२ किमी अंतर असलेली सामुद्रधुनी जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असून, जगातील मोठ्या प्रमाणात कच्चे तेलाची याच मार्गाने जलवाहतूक केली जाते. सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्याने जागतिक बाजारात तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या आहेत. अनेक देशांमध्ये इंधन तुटवडा आणि आर्थिक तणाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या भारतात पुरेसा तेल साठा आणि गॅससाठा असला तरी अनेक देशांत तेल आयात करणाऱ्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरू शकते. होर्मूझ सामुद्रधुनीतील तणाव हा केवळ प्रादेशिक मुद्दा राहिलेला नसून जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा सुरक्षेसाठी मोठे आव्हान ठरत आहे. इतर देशांमध्ये या युद्धामुळे कोणतीही भीषण परिस्थिती जाणवू नये यासाठी भारतासह अनेक देश परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# आठ हजार शिक्षकांवर टांगती तलवार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिक्षक भरतीसाठी १७ जून २०१७ पासून पवित्र पोर्टल सुरू करण्यात आले आहे. मात्र काही दिवस पोर्टल बंद असताना आठ हजार शिक्षकांचीम खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेमध्ये भरती करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. समिती शिक्षकांच्या कागदपत्राची तपासणी करणार आहे त्यामुळे ८००० शिक्षकांवर टांगती तलवार असल्याचे दिसून येत आहे.

शाळांचा कारभार पारदर्शक चालावा यासाठी कठोर निर्णय घेतला आहे. अनेक संस्थापक शिक्षकांची बोगस भरती करीत आहेत. याची नंबर दखल घेण्यात आली असून. २२ जून २०१७ पासून पवित्र पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर शिक्षक भरतीसाठी शिक्षक पात्र ठरणार आहेत. काही दिवस पोर्टल बंद असताना राज्यातील खाजगी अनुदानित मध्ये आठ हजार शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. या शिक्षकांच्या मान्यता सह कागदपत्राचे पडताळणी करण्यासाठी शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली. तीन सदस्य समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढे निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे आठ हजार शिक्षकांवर टाकी तलवार असल्याची दिसून येत आहे.

नागपूर ६५० नाशिक ८०० तर आणि जिल्ह्यामध्ये शेकडो यामध्ये शालांतरायटीचा घोटाळा झाला असल्यामुळे घोटाळा समोर आला आहे. राज्यातील १७ हजार माध्यमिक व उच्च माध्यमिक तीन लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे. यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत फुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य समिती नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती तीन लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणार आहे. यामुळे शिक्षण विभागांमध्ये खळबळ उडाल्याची दिसून येत आहे.

# 'मी ४ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या साहेबांची सून, ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजितदादांची पत्नी'; सुनेत्रा पवारांची बारामतीकरांना भावनिक साद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती: आदरणीय अजित दादांचे जाणे ही केवळ माझी किंवा माझ्या कुटुंबाची वैयक्तिक हानी नाही, तर ती संपूर्ण बारामती आणि महाराष्ट्राची हानी आहे. बारामतीकरांच्या विकासासाठी आणि दादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी माझं दुःख सुद्धा तळघरात कोंडलं आहे आणि अत्यंत धीरानं तुमच्यासाठी बाहेर पडले आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील यांसह महायुतीचे अनेक दिग्गज नेते, आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**बारामती म्हणजे दादांचा श्वास**

आपल्या भाषणाची सुरुवात करताना सुनेत्रा पवार यांनी दिवंगत यशवंतराव चव्हाण आणि अजित पवार यांच्या स्मृतीस अभिवादन केले. बारामतीत ही पोट निवडणूक होईल असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं. दादा आजही आपल्यात नाहीत हे मला मान्यच नाही. नियतीने हा कठीण काळ आपल्यावर आणला आहे, असे त्या



म्हणाल्या. बारामतीशी असलेल्या दादांच्या नात्याबद्दल बोलताना, दादांसाठी बारामती म्हणजे आई सारखी होती. इथला प्रत्येक नागरिक हा त्यांच्यासाठी पांडुरंग होता. बारामतीमध्ये दादांचा श्वास होता, म्हणूनच त्यांचा अखेरचा श्वासही याच मातीत विसावला, असेही त्यांनी सांगितले.

**तुमची साथ हीच माझी शक्ती**

सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या की, गेल्या ३५-३६ वर्षांत तुम्ही दादांना नेहमीच प्रचंड मताधिक्याने निवडून दिले आहे. आज हा अर्ज भरताना मला जो धीर मिळाला आहे, तो केवळ तुम्हा बारामतीकरांकडे बघूनच आला आहे. तुमचं प्रेम, तुमचा पाठिंबा आणि तुमची साथ हीच माझी खरी शक्ती आहे.

**बारामतीचा विकास सुरु राहील'**

बारामतीचा विकास कायम सुरू राहील. प्रशासनावर दरारा राहील, बारामतीची ओळख तशीच राहील. गुंडागर्दी आणि खंडणीला थारा मिळणार नाही. आता विकास थांबणार नाही याची खात्री बाळगा, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. महायुतीचा भक्कम पाठिंबा आपल्याला आहे. अजितदादांचा विचाराचा वारसा सांभाळात मी काम करीत राहील. ४ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या साहेबांची सून म्हणून ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजितदादांची पत्नी म्हणून मला राज्य सांभाळायाची ताकद मिळेल, असंही सुनेत्रा पवार म्हणाल्या. अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. पण त्यांचा विचार पुढे घेऊन जाते. जय पवार आणि पार्थ पवार हे माझं कुटुंब नाही. तुम्ही सगळे माझं कुटुंब आहात. एकालाही वाऱ्यावर सोडणार नाही. अजितदादांचा जनता दरबार सुरू राहील. बारामतीचा विकास कायम सुरू राहील, असेही यावेळी सुनेत्रा पवार म्हणाल्या आहेत.

## लघु उद्योगांना भूखंड शुल्कात २० टक्के सवलत; 'एमएसएमई' क्लस्टरला बळ; जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचा निर्णय

मुंबई : आखाती देशातील युद्धामध्ये जागतिक बाजारपेठेत निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फटका राज्यातील उद्योगांना बसू नये, यासाठी महायुती सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) बळ देण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांच्या (कॉमन फॅसिलिटी सेंटर्स) भूखंड शुल्कात तब्बल २० टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

इराण-इस्त्राईल आणि अमेरिकेतील युद्धामुळे कच्च्या मालाचा पुरवठा आणि निर्यातीवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील लघुउद्योजकांना उभारी देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भूखंड शुल्कात मोठी कपात करण्यात आली आहे. याशिवाय, उद्योगांना आकारले जाणारे १० टक्के प्राधान्यक्रम शुल्कही आता माफ करण्यात आले असून, ही सवलत २०० चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडांना लागू असेल. यामुळे लहान उद्योजकांना एकत्र येऊन स्वतःचे क्लस्टर उभारणे अधिक सुलभ होणार आहे.

यासोबतच सामायिक सुविधा केंद्रांमधील अंतर्गत डांबरी रस्ते आता एमआयडीसी स्वतः बांधून देणार आहे. विशेष म्हणजे, या रस्त्यांच्या जागेसाठी उद्योजकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. भविष्यात विकसित होणाऱ्या नवीन औद्योगिक वसाहतींमध्ये एमएसएमई क्षेत्रासाठी स्वतंत्र भूखंडांचे नियोजन करण्याचे धोरणही उद्योग विभागाने आखले आहे. यामुळे 'मोठ्या' उद्योगांच्या स्पर्धेत अडकण्याऐवजी लघुउद्योजकांना हक्काची जागा मिळणे सोपे होणार आहे.

राज्यातील लघु उद्योगांची संख्या - सूक्ष्म उद्योग : ७० लाख ३१ हजार ४८१ लघुउद्योग : ७४ हजार ४९९ मध्यम उद्योग : ६ हजार ८८९

# नळदुर्ग येथे वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.केगायकवाड : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तुळजापूर अगार अंतर्गत येणाऱ्या नळदुर्ग बस स्थानक येथे सेवेत कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष वाहतूक नियंत्रण महेश डुकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रवासी ग्रामस्थ,महामंडळाचे कर्मचारी, पत्रकार यांच्या वतीने बस स्थानकातच अभिष्टचिंतन करण्यात आले.

नुकताच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छ बसस्थानक सुंदर बस स्थानक या स्पर्धेमध्ये नळदुर्ग बस स्थानकाचा प्रथम क्रमांक आला. या स्पर्धेमध्ये वाहतूक नियंत्रण महेश डुकरे यानी महत्वाची भुमिका बजावली आहे. त्यामुळेच नळदुर्ग बस स्थानकाचा स्वच्छता स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला. महेश डुकरे हे आपली सेवा करत करत सामाजिक कार्यात ही सक्रिय आहेत.आपल्या राज्य परिवहन महामंडळातील वाहतूक नियंत्रक म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करतात त्यामुळे एक वेगळी शिस्त या बसस्थानकात दिसून येते. त्यांचा दि.६ एप्रिल हा





जन्मदिन बस स्थानकातचं त्यांची सेवा चालू असतानाचं महामंडळातील वाहक,चालक कर्मचारी हितचिंतक मित्रपरिवार यांनी अभिष्टचिंतन केले तर शीघ्रकवी प्रदीप पाटील बसवंतवाडीकर यांनी त्यांच्यावर काव्यरचना करून गीत गायनाच्या माध्यमातून अभिष्टचिंतन केले.

याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार इरफान काझी,रिपाइं (आठवले) तथा पत्रकार एस.के.गायकवाड वाहक काशिनाथ कुंभार सह महामंडळातील कर्मचारी प्रवासी ग्रामस्थ उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

**एमएसएफडीए आणि स्वेरीचा संयुक्त उपक्रम**

**मिथिलेश भाकरे, प्रा. प्रभाकर कोळेकर यांचा सत्कार**

# स्वेरीमध्ये प्राध्यापकांची पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'इलेव्हेट अँड इनोव्हेट: नेक्स्ट जनरेशन टिचिंग एक्स्प्लोरींग इन्क्लुयुजीव्हीटी अँड डायव्हर्सीटी' (उन्नयन आणि नवनिर्मिती: सर्वसमावेशकता व विविधतेचा वेध घेणारी आधुनिक अध्यापन पद्धती) या विषयावर दि.१० मार्च ते दि. १४ मार्च २०२६ दरम्यान पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) यशस्वीरित्या संपन्न झाला.




स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यशाळेचे उदघाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या 'स्कुल ऑफ सोशल सायन्सेस' चे संचालक प्रा. गौतम कांबळे यांच्या हस्ते झाले. 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी'चे मिथिलेश भाकरे आणि 'पीएम-उषा' चे नोडल अधिकारी प्रा. प्रभाकर कोळेकर हे विशेष अतिथी म्हणून यावेळी उपस्थित होते. प्रास्तविकात डॉ.यशपाल खेडकर यांनी समावेशक व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारी तसेच प्राध्यापकांची कार्यक्षमता वाढवण्यात आणि शिक्षणाला सातत्याने बदलणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत करण्यात अशा कार्यशाळेची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या प्रथम सत्रात मिथिलेश भाकरे यांनी आपल्या 'फाउंडेशन ऑफ इन्क्लुजिव्ह क्लासरूम्स' या प्रथम सत्राचा उद्देश हा शिक्षकांमध्ये समावेशक शिक्षणाबद्दल जागरूकता आणि समज निर्माण करण्याचा असल्याचे सांगितले. सहयोग, सहानुभूती आणि लवचिक अध्यापन पद्धतींवर भर देऊन, प्रत्येक विद्यार्थ्याला मूल्यवान, समावेशक आणि शैक्षणिक यश मिळवण्यास सक्षम वाटेल असे वर्ग तयार करण्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे, हे या सत्राचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. द्वितीय सत्रात भाकरे यांनीच 'प्रभावी अध्यापन सातत्याने टिकवून ठेवण्यासाठी शिक्षकांचे स्वास्थ्य आणि मानसिक आरोग्य यांचे महत्त्व शिक्षकांना अधिक चांगल्या प्रकारे समजावून सांगण्यात आले. त्यानंतर 'जैवविविधता, पर्यावरण आणि शाश्वतता' या विषयावरील सत्रात नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्याच्या आणि पर्यावरणीय समतोल राखण्याच्या महत्त्वाविषयी जागृती निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. द्वितीय दिवसाच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. के. के. रॉय यांनी कार्यशाळेत सहभागी असलेल्या सर्व शिक्षकांना 'मुक्स' अंतर्गत असलेल्या सर्व ऑनलाईन कोर्सेसचे महत्व समजावून सांगून 'प्रभावी डिजिटल अभ्यासक्रम रचनेबाबत शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले. पुढे डिजिटल कोर्सेसच्या निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा कशाप्रकारे वापर करता येऊ शकतो? यावर मार्गदर्शन करण्यात आले. ई-सामग्रीसाठी प्रभावी पॉवर प्रेझेंटेशन तयार करण्याचे प्रात्यक्षिक सहभागी शिक्षकांना दाखविले. तृतीय दिवसाच्या सत्रामध्ये डॉ. गौरव कडलग यांनी प्रभावी अध्यापन पद्धतींना चालना देण्यासाठी, एच५पी आणि 'पियर डेक' सारख्या विद्यार्थी सहभाग केंद्रित साधनांवर आधारित एक प्रशिक्षण सत्र प्राध्यापकांसाठी आयोजित केले. यानंतर पुढील सत्रात उच्च शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे वाढते महत्व जाणून घेण्यासाठी, अध्यापन आणि संशोधनातील एआय या विषयावर प्राध्यापकांसाठी एका सत्राचे आयोजन करण्यात आले होते. चौथ्या दिवसाच्या सत्रामध्ये डॉ. महेश शिंदे यांनी राष्ट्रीय शिक्षा धोरण एनईपी -२०२० याअंतर्गत मुक्त आणि दूरस्थ शिक्षण प्रणालीवर प्रकाश टाकला. ऑनलाईन कोर्स प्लॅटफॉर्म (मुक्स) हे विविध प्रकारचे शिक्षण घेणाऱ्यांसाठी आपले ज्ञान आणि कौशल्ये अद्ययावत करण्याचे एक लोकप्रिय माध्यम बनले असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन कोर्स (मुक्स) तयार करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या विविध वैशिष्ट्यांचा वापर कसा करावा? यावर देखील मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर विद्यार्थी-सामग्री, शिक्षक आणि अध्यापन प्रकियेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. पाचव्या दिवशी डॉ. समाधान निकुंभ यांनी मुक्त शैक्षणिक संसाधने (ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस) आणि आधुनिक शिक्षण पद्धतींमध्ये त्यांचे वाढते महत्त्व या विषयावर चर्चा केली. शैक्षणिक व्हिडिओ आणि डिजिटल आशयासाठी प्रभावी संहिता तयार करणे व ती कशाप्रकारे लिहावी यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर सहभागी शिक्षकांचे संबंधित विषयावर व्हिडिओ आणि डिजिटल आशयाचे सादरीकरण घेण्यात आले. त्यानंतर सर्व सहभागी शिक्षकांनी कार्यक्रमाबद्दल प्रतिक्रिया दिली. यावेळी सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. दिग्विजय रोंगे व प्रा. कुलदीप पुकाळे यांच्यासह स्वेरीच्या प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भारतीय जनता पार्टीचा ४६ वा वर्धापन दिन प्रशांतराव परिचारक यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून साजरा

## पंढरपूर भाजपा कार्यालयात एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीच्या ४६ स्थापना दिनानिमित्त पंढरपूर भाजप कार्यालयात एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की भारतीय जनता पार्टीचा बीजेपी स्थापना दिवस दरवर्षी सहा एप्रिल रोजी साजरा केला जातो सहा एप्रिल १९८० रोजी मुंबईत अटल बिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाची स्थापना झाली हा दिवस भाजपच्या राष्ट्रवादीच्या विचारांच्या आणि देश सेवेच्या गौरव म्हणून साजरा केला जातो १९७५ च्या आणीबाणी नंतर १९७७ मध्ये अनेक विरोधी पक्ष एकत्र येऊन जनता पार्टी स्थापन झाली तथापि दुहेरी सदस्यांच्या मुद्द्यावरून ६ एप्रिल १९८० रोजी जनसंघाच्या नेत्यांनी वेगळे होऊन भारतीय जनता पक्षस्थापन केला व आज भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस म्हणून संपूर्ण देशभरात साजरा केला जातो. आज भाजपने आपले नेते कार्यकर्ते यांच्या घरावर भाजपचा ध्वज फडकावावा असे आवाहन केले व तसेच पक्षांनी दिलेल्या पक्षाने दिलेली विचार व ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्थापन केला आज भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिवस म्हणून संपूर्ण देशभर साजरा केला जातो. आज भाजपने चे नेते व कार्यकर्ते यांनी आपल्या घरावर भाजपचा ध्वज फडकवावा असे आव्हान केले तसेच पक्षांनी दिलेले विविध कार्यक्रम द्वारे पक्षाचे विचार आणि देह धोरणे लोकांपर्यंत पोहोचवण्यात यानिमित्ताने श्याम प्रसाद मुखर्जी व पंडित दीनदयाल उपाध्याय, आणि अटल बिहारी वाजपेयी यांच्या योगदानाचे पक्षाची योग ध्येय धोरणे सामान्य नागरिक व खेड्यापाड्यात वाड्या वस्त्यांवर शहरात प्रत्येक वार्डा वार्डात पोचवतील तसेच भारतीय जनता पक्षाचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णासाहेब साठे तसेच इतर महापुरुष यांची जयंती साजरी करावी असेही आव्हानही केले.




यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहित पानकर तालुका अध्यक्ष सुभाष मस्के, करकम मंडल अध्यक्ष हर्षद कदम, महिला अध्यक्ष ज्योती शेटे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश राव मुळे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे सर, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, गटनेते वासुदेव बडवे, सुजित कुमार सर्व गोड हे उपस्थित होते




यावेळी ध्वज आणि म्हणून नगरसेवक अँड सुनील वाळुंजकर यांनी काम पाहिले.यावेळी पंढरपूर मधील सर्व भाजप प्रेमी सन्माननीय पदाधिकारी, हाजी माजी नगरसेवक पंचायत समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपाचा स्थापना दिन उत्साहात साजरा; ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल निर्मळे यांच्या नेतृत्वाखाली विक्रोळी पार्कसाईट येथील भाजप कार्यालय येथे ध्वजारोहण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त विक्रोळी पार्कसाईट येथे ध्वजारोहण करून ४६ वर्षांच्या समर्पणाचा उत्सव साजरा करण्यात आला. भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त देशभरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. ४६ वर्षे समर्पणाची,४६ वर्षे भाजपाचीहा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यात आला. विक्रोळी पार्क साईट, वॉर्ड क्रमांक १२३ आणि १२४ येथे भाजपा कार्यालयासमोर ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.




यावेळी भाजपा नेते अनिल निर्मळे (ईशान्य मुंबई उपाध्यक्ष)यांच्या नेतृत्वाखाली मंडळ अध्यक्ष संतोष गांजले, उमेश कोठावदे तसेच शंकर मडये यांच्या हस्ते पक्षाचा झेंडा फडकवण्यात आला. त्यानंतर पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी उमेश कोठावदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित संजय सिंग, सुधीर ढकोलिया, संदीप शेटे, जय सावंत, लता कांबळे, म्हापसेकर, वायकुळ,दत्ता सोनवणे, जे पी भाई, आप्पा पालांडे, प्रवीण धुमाळ तसेच महिला -पुरुष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामनगर (अ) येथील रस्त्यावर पथदिवे लावण्याची प्रहारचे प्रशांत मुके यांची मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्तांकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज) : रामनगर (अ) ट्रान्झिट कॅम्प येथील मुख्य रस्त्यावर पथदिवे लावण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके यांनी मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

डोंगराळ भागात राहणाऱ्या नागरिकांच्या येण्या-जाण्यासाठी रामनगर(अ) ट्रान्झिट कॅम्प हा मुख्य रस्ता असल्याकारणाने सदर रस्त्यावर रात्री उशिरापर्यंत नागरिकांची रहदारी चालू असते. स्थानिक नागरिकांना कामावर जाण्यासाठी तसेच घरी जाण्यासाठी हा मुख्य रस्ता असून लहान मुले,वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक,महिला तसेच वाहन चालक यांना रात्रीच्या वेळी या रस्त्यावर अंधार असल्यामुळे येण्या-जाण्यासाठी अत्यंत जिकिरीचे होते.याशिवाय या रस्त्यावर होणाऱ्या अंधारामुळे कोणतेही चुकीचे प्रकार याठिकाणी घडू नयेत. म्हणून याठिकाणी तत्काळ पथदिवे लावावेत,जेणेकरून या रस्त्यावरून रात्री येजा करणाऱ्या स्थानिक नागरिकांना सुरक्षितता वाटेल.

अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके यांच्याकडून करण्यात आली आहे.

# कर्मवीर पारितोषिकासाठी पंढरपूरातील महाविद्यालयाची आज प्रत्यक्ष तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी देण्यात येणाऱ्या कर्मवीर पारितोषिकासाठी पात्र ठरलेल्या महाविद्यालयांच्या प्रत्यक्ष तपासणी प्रक्रियेला वेग आला असून, पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाला मंगळवार, दिनांक ७ एप्रिल रोजी समिती भेट देणार आहे.



या तपासणीसाठी नियुक्त समितीमध्ये चेअरमन म्हणून मा. प्रि. डॉ. साळुंखे एस. टी. (यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदस्य म्हणून मा. प्रि. डॉ. कदम एल. डी. (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव), मा. प्रा. पाटील जे. एन. (यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा) आणि श्री. कांबळे एस. आर. (सिनिअर क्लार्क, ऑडिट डिपार्टमेंट, रयत शिक्षण संस्था, सातारा) यांचा समावेश आहे.

संस्थेकडून प्राप्त माहितीनुसार, १५०० पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या महाविद्यालयांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, त्यामध्ये पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा समावेश आहे. समितीचे अध्यक्ष व सदस्य महाविद्यालयाला भेट देऊन शैक्षणिक, प्रशासकीय तसेच इतर उपक्रमांची सखोल पाहणी करणार आहेत.

तपासणीदरम्यान संस्थेने दिलेल्या प्रश्नावलीनुसार कागदपत्रांची पडताळणी, विविध उपक्रमांचा आढावा आणि एकूण कार्यपद्धतीचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महाविद्यालय प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून, समितीच्या स्वागताची तयारी पूर्ण केली आहे.

या तपासणीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला अधोरेखित करण्याची संधी मिळणार असून, कर्मवीर पारितोषिकासाठी महाविद्यालयाची दावेदारी अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ही माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी दिली आहे.

# तालुका आरोग्य संपन्न गाव कृती दल समितीची बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी एप्रिल पासून 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे विशेष अभियान सुरु करण्यात आले असून निफाड तालुका आरोग्य संपन्न गाव कृती दल समितीची बैठक निफाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांच्या अध्यक्षतेखाली निफाड पंचायत समितीमध्ये नुकतीच संपन्न झाली.

याप्रसंगी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुजित कोशिरे यांनी निफाड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान राबवून निफाड तालुका आरोग्य क्षेत्रात आदर्श बनवण्याचा संकल्प आपण केला असल्याचे सांगितले. तसेच सहभागी ग्रामपंचायतींचे ५९ निकषांवर गुणांकन करण्यात येणार असून ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना 'आरोग्य संपन्न ग्राम' घोषित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कार ५ कोटी ते २ कोटी रुपयांपर्यंत असतील, याव्यतिरिक्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक आणि डॉक्टरांचाही विशेष गौरव केला जाईल असेही डॉ.सुजित कोशिरे यांनी सांगितले.

> **तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सदर अभियानात सक्रिय भाग घ्यावा. तसेच सर्व विभागांच्या सहकार्याने वेळोवेळी निर्देशांक सुधारण्यासाठी तालुकास्तरीय कृती समितीने त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना सूचना द्याव्यात.**
> **– नम्रता जगताप, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड**

तसेच या अभियानात 'आरोग्य संपन्न' ठरणाऱ्या गावाला रोख पुरस्कार देण्यात येणार असून लोकसहभागावर आधारित उपक्रमाचा उद्देश गावपातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावणे, प्रतिबंधात्मक या प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हा आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, प्रतिबंधात्मक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान सुरु झाले आहे.तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतींनी या अभियानात सहभागी होण्यासाठी ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे.हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी अशीही अपेक्षा यावेळी सदस्यांनी व्यक्त केली.

> **गावांना स्वयंपूर्ण निरोगी व रोगमुक्त करणे मुख्य उद्देश आहे. ह्या अभियानात केवळ उपचारांवर भर नसून अभियान प्रतिबंधात्मक व आरोग्यदायी जीवन शैलीवर केंद्रित आहे**
> **– डॉ. सुजित कोशिरे, तालुका वैद्यकीय अधिकारी, निफाड**

यावेळी समितीच्या अध्यक्षा तथा गटविकास अधिकारी नम्रता जगताप, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील,सदस्य तथा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजित कोशिरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे, गटशिक्षणाधिकारी विलास साळी,सदस्य राहुल दवते,डॉ. इरेरा पाटील, डॉ.मयूर बिरपांडे, डॉ.संजय दाणी, डॉ.पुरुषोत्तम चारुडे, डॉ.आनंद सुर्वे, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कविता पाटील, संदीप शिंदे,विस्तार अधिकारी राजेंद्र सानप, सोनिया गायकवाड, पी. डी. बोरसे, एम. आर. पवार यांसह मान्यवर उपस्थित होते.

### भोसे गावात पूर्व परवानगी घेऊनच बसविण्यात येणार छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा

# महापुरुषांचे पुतळे उभारताना शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे : सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात थोर पुरुषांचे पुतळे उभारण्या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. काही ठिकाणी विनापरवानगी अति उत्साहात चुकीच्या ठिकाणी पुतळे उभारतात. हे अत्यंत चुकीचे असून थोर महापुरुषांचे पुतळे उभारताना राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे जरी केले असून त्या तत्त्वांचे पालन करावे असे आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

दिनांक ०५ एप्रिल २०२६ रोजी भोसे तालुका पंढरपूर या ठिकाणी पहाटे चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनावर आरूड असलेला पुतळा भोसे येथील चौकात




बसविण्यात आला होता. या पुतळ्यासाठी पूर्वपरवानगी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली गेली नव्हती या अनुषंगाने पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन ,जिल्हा परिषद प्रशासन यांनी या गोष्टीची तात्काळ दखल घेऊन तेथील सरपंच, पदाधिकारी जेष्ठ नागरिक तसेच युवक व ग्रामस्थ यांच्या याबाबत सोबत विविध चर्चा करण्यात आली.

पुतळा बसविल्यानंतर परवानगी बाबतची प्रक्रिया पार पाडावी असा गैरसमज निर्माण झाले असल्याचे प्रशासनाने तेथील ग्रामस्थांच्या लक्षात आणून दिले. भोसे गावातील ग्रामस्थांनी प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन पुतळा स्थलांतरित करून सुरक्षित स्थळी ठेवला.सदर पुतळा उभारण्यासाठी ग्रामस्थांनी रीतसर अर्ज केला असून, परवानगी मिळाल्यास गाजत बसवावा. तसेच आवश्यक सुशोभीकरण करावे.भोसे ग्रामस्थांनी सोलापूर जिल्ह्यासह राज्यात पुतळा उभारणे बाबतचा आदर्श समोर ठेवला असून रीतसर परवानगी घेऊनच पुतळा उभारला जाणार आहे.

पुतळा उभारण्या बाबत योग्य मार्गदर्शनासाठी मंगळवार दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी प्रांताअधिकारी सचिन इतापे, तहसीलदार सचिन लंगुटे तसेच सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्राम सेवक यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याचेही सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

# दिल्ली स्पेशल सेलकडून कुर्ल्यातील १८ वर्षीय तरुणाला अटक; पोलिसांनी उधळला दहशतवादी हल्ल्याचा कट

दिल्ली : दिल्ली पोलीस स्पेशल सेलकडून एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. दिल्लीत दहशतवादी हल्लयाचा घडवून आणण्याचा कट रचल्याने त्यांनी कुर्ला मधून एका १८ वर्षीय मुलाला अटक केली आहे.

दिल्लीत टॉय कारच्या माध्यमातून घातपात घडवण्याचा कट उधळण्यात आला असून या प्रकरणात मुंबईतील कुर्ला येथून १८ वर्षीय हमास सिद्दीकीला अटक करण्यात आली आहे. दिल्ली स्पेशल सेल आणि महाराष्ट्र एटीएसने संयुक्त कारवाई करत ही अटक केली.

अटक झालेल्या हमासच्या वडिलांनी, जलालुद्दीन सिद्दीकी यांनी घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, ३ तारखेला पहाटे साडेचार ते पाचच्या सुमारास १८ ते २० अधिकारी त्यांच्या घरी आले आणि हमासला ताब्यात घेऊन गेले. माझा मुलगा नुकताच १८ वर्षांचा झाला आहे. तो एक विद्यार्थी आहे, गुन्हेगार नाही. तो अभ्यासू असून दहावीत त्याला ७६ टक्के गुण मिळाले होते, असे त्यांनी सांगितले.

गेल्या दोन-तीन महिन्यांत ऑनलाइन गेम खेळताना त्याचा काही लोकांशी संपर्क झाला असावा, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिल्याचेही त्यांनी नमूद केले. जागतिक स्तरावर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन गेम्समधूनच हे संपर्क जुळले असावेत, असा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला असल्याचे ते म्हणाले.

हमास काही संशयितांच्या संपर्कात होता आणि दिल्लीत घातपाताचा कट रचण्यात त्याचा सहभाग असल्याचा दावा तपास यंत्रणांकडून करण्यात येत आहे. मात्र, याबाबत बोलताना त्याच्या वडिलांनी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसून न आल्याचे स्पष्ट केले.

गेल्या काही महिन्यांत त्याचे फोन कॉल्स वाढले होते. त्याची आईनेही याकडे लक्ष वेधले होते. तो बराच वेळ फोनवर बोलत असे, कधी बाहेर जाऊनही बोलत होता. आम्ही त्याला याबाबत विचारणा केली आणि अभ्यासावर लक्ष देण्याचा सल्ला दिला. त्यानेही होकार दिला होता. पण याशिवाय कोणतीही संशयास्पद कृती आम्हाला आढळली नाही, असे जलालुद्दीन यांनी सांगितले.

तपास यंत्रणांच्या दाव्यांना त्यांनी फेटाळून लावत, ही सर्व माहिती एजन्सीकडून पसरवली जात आहे. माझा मुलगा असा नाही, असेही त्यांनी ठामपणे म्हटले.

# सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची आढावा बैठक संपन्न

## पक्ष निरीक्षक नागेश फाटे यांनी घेतला जिल्ह्याच्या पक्षकार्याचा आढावा, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने रणनीती ठरविण्यावर भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरदचंद्र पवार गट) सातारा जिल्हा निरीक्षक नागेश फाटे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली.

सुरुवातीला सातारा राष्ट्रवादी भवन येथील बैठकीत पक्ष निरीक्षक नागेश फाटे यांनी जिल्हाध्यक्ष तथा माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांकडून पक्षकार्याचा आढावा घेतला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्ह्यातील पदाधिकारी, तालुका प्रमुख, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील पक्ष, संघटन मजबूत करण्यावर, कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर तसेच आगामी निवडणुकांच्या दृष्टीने रणनीती ठरविण्यावर भर देण्यात आला.

यावेळी नागेश फाटे सर्व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत संघटन वाढीसाठी प्रत्येक गाव-पातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या तसेच कार्यकर्ते हेच पक्षाचे खरे बळ असून त्यांच्याच जोरावर पक्षाला पुन्हा उभारी देता येईल. तसेच युवक, महिला आणि विद्यार्थी संघटनांना बळकट करून पक्षाचा विस्तार करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील म्हणाले की, सध्या जिल्ह्याची कार्यकारणी बरखास्त झाले असून नव्याने जोमाने कार्यकारणी तयार करण्यात येत असून काम करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येऊन आगामी नेमणुका करण्यात येतील. तसेच प्रत्येक तालुक्यात व शहरात स्वतंत्र बैठका घेण्याचा निर्णयही घेण्यात आला. प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये गावोगावी बूथनिहाय कार्यकर्त्यांची साखळी तयार करून सातारा जिल्हा राष्ट्रवादीमय करण्यासाठी सर्वजण पुन्हा जोमाने कामाला लागू असे आवाहन बाळासाहेब पाटील यांनी केले.

सदर बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे, साहिल (बाबा) शशिकांत शिंदे, परिजात दळवी, नरेश देसाई, सतीश चव्हाण, सुनील गाडेकर, शफिक शेख, विक्रम सिंह, सचिन फडतरे, किरण जाधव, चौधरी गोरखनाथ, नलवडे राजकुमार, पाटील उमेश, देशमुख नंदकुमार, मोरे नितीन, लवंगाडे घनश्याम शिंदे महिला जिल्हाध्यक्ष सौ रंजना जगदाळे, अर्चना देशमुख, समिंदरा जाधव, तेजस्वी केसरकर, उषा जाधव, कुसुमताई, पूजा बनसोडे, सुवर्णताई पाटील, यांचे सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्ह्याचे सर्व सर्व आजी-माजी पदाधिकारी विविध सेलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सेवाकार्याचे भाग्य व सलग ६ व्यांदा नगरसेवक हा बहुमान महेश इंगळे यांच्या जीवनाला लाभलेले स्वामी कृपेचे वरदान : वनिता सुरवसे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : स्वामी सेवेच्या माध्यमातून येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मधील सेवाकार्याचे भाग्य व सलग ६ व्यांदा नगरसेवक हा बहुमान महेश इंगळे यांच्या जीवनाला लाभलेले स्वामी कपेचे वरदान असल्याचे मनोगत गोगावच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी व्यक्त केले.

आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात गायिका कनिष्का शिवपुजे यांच्या भक्ती संगीत सेवेपुर्वी गोगावचे सरपंच वनिता सुरवसे यांच्या परिवाराच्या वतीने देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांचा देवस्थान मधील सेवा कार्याबद्दल व सलग ६ वेळा नगरसेवक पदी निवडून आल्याबद्दल शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच सुरवसे बोलत होते.

यावेळी उद्योजक मधुकर सुरवसे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, प्रशांत गुरव, रमेश शिंदे सर, प्रसाद पाटील सर, बाळासाहेब कुलकर्णी, प्रा.शिवशरण अचलेर, ओंकार पाठक, भोसले सर, विवेक कानडे, श्रीशैल गवंडी व स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे जनतेपर्यंत पोहोचवा; ऑनलाईन मिटींगद्वारे जिल्हा निरीक्षकांशी संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांचे वतीने आज सर्व नुतन जिल्हा निरिक्षक यांची ऑनलाईन मिटींग राष्ट्रवादी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आपले प्रेरणास्थान आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष माननीय आमदार श्री शशिकांत शिंदे साहेब, आमदार रोहित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज पार पडली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील पक्ष निरीक्षक ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे साहेब यांनी पक्ष निरीक्षक यांचेशी संवाद साधताना सांगितले की, पक्षाचे निरीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडताना सर्वांना विश्वासात घेऊन गाव पातळीवर कार्य करणाऱ्या पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची यांचा आढावा घेण्यात यावा. पक्ष वाढीसाठी व बळकटीसाठी काम करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांना प्राधान्याने संधी देण्यात यावी तसेच सर्वसामान्य जनतेपर्यंत आपल्या पक्षाची ध्येय धोरणे पोहोच करावी असे सांगितले.

याप्रसंगी नागेश दादा फाटे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, पक्षाने माझ्यावर दिलेली जाबदारी प्रामाणीक पणे पार पाडीन तसेच पक्ष मजबुतीसाठी स्थानिक पातळीवरील ज्येष्ठ पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन पक्ष संघटना बळकटीवर भर देवून पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोच करुन पक्षवाढीसाठी कटीबध्द राहू असे फाटे यांनी सांगीतले.

# कळंब येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब / प्रतिनिधी : कळंब येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने कल्पना नगर येथील लिम्बुनी बौद्ध विहार येथे सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत जयंतीच्या अध्यक्षपदी अभिजीत जाधव,तर उपाध्यक्ष यश बनसोडे, कोषाध्यक्ष अनिकेत कलवरकर, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या जयंतीनिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे. या मध्ये वकृत्व, निबंध, सुंदर हस्ताक्षर, सामान्य ज्ञान, स्लो सायकल, धावणे, मुला मुलींचे नृत्य ,संगीत खुर्ची, जोडीची संगीत खुर्ची, महिलांसाठी खास पैठणचा खेळ इत्यादी स्पर्धा घेण्याचे या बैठकीमध्ये ठरले. या जयंती कार्यक्रम बैठकीला सतपाल बनसोडे, बाळासाहेब हौसलमल, मोतीचंद बागरेचा,राजा सय्यद, संदीप सोनवणे, राकेश जगताप,तुषार रणदिवे, दादा खंडागळे, अमित जाधव,विनोद जगताप, वैभव गायकवाड, बुवा वाघमारे, सौरभ गायकवाड, लाला कांबळे, दीपक गायकवाड, नितीन आंगरखे, अनिकेत गायकवाड यांच्या सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- निबंध स्पर्धा
- सुंदर हस्ताक्षर स्पर्धा
- सामान्य ज्ञान स्पर्धा
- स्लो सायकल स्पर्धा
- धावणे स्पर्धा
- मुला-मुलींची डान्स स्पर्धा
- संगीत खुर्ची स्पर्धा
- जोडीची संगीत खुर्ची स्पर्धा
- महिलांसाठी पैठणचा खेळ

# भिवंडीत काळ्या जादूच्या बहाण्याने भोंदू बाबांनी घातला अनेकांना लाखोंचा गंडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आर्थिक तंगी,व्यवसायातील मंदी,पती पत्नीचे आजारपण व मुलांवरील काळी जादू उतरवण्याच्या बहाण्याने शहरात व ग्रामीण भागात अनेक भोंदू बाबांनी महिलांसह नागरिकांना लाखोंचा गंडा घेतल्याच्या अनेक घटना भिवंडीत घडल्या आहेत.तर काही घटनांमध्ये स्मशानभूमीत काळी जादू केल्या प्रकरणी देखील गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एका प्रकरणात जानेवारी २०२५ मध्ये घरात सुख शांती व आर्थिक प्रगतीसाठी एका मृतदेहाची पूजा करायच्या बहाण्याने भोंदू बाबाने महिलेची ८ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी महिलेने अंधश्रद्धा निर्मूलन सिमितीच्या मदतीने शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असता पोलिसांनी भोंदूबाबाला अटक केली होती. हजरत बाबा उर्फ अमजद असद खान असे अटक करण्यात आलेल्या भोंदू बाबाचे नाव होते.

हा भोंदूबाबा ४५ वर्षीय महिलेच्या दुकानात ऑक्टोंबर २०२३ मध्ये ग्राहक म्हणून आला असता चिंताग्रस्त पती सोबत बोलताना तुमच्यावर व मुलावर काळी जादू झाली असून,मुला वरील काळी जादू न उतरवल्यास सहा महिन्यात तो जीव गमावून बसेल अशी भीती दाखवली होती.यावेळी महिलेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांच्यासमोर घरात केलेल्या पुजे दरम्यान अंड्या मधून खिळा काढून दाखवला होता.

यानंतर काळ्या जादू साठी मृतदेहाची गरज असून चांदवड मालेगाव येथे मृतदेह मिळणार असल्याचे सांगत पीडित कुटुंबीयांना बाबा चांदवड मालेगाव येथे घेऊन गेले.तेथील एका बाबाच्या साथीदाराने दहा लाख रुपयांत मृतदेह मिळेल असे सांगितल्या नंतर भोंदू बाबाने आठ लाख रुपयांत मृतदेहाचा सौदा केला.त्यांनतर महिलेचा विश्वास बसावा म्हणून एका मृतदेहाचा फोटो मोबाईलवर पाठवला.माहिलेकडे पैसे नसल्याने याच भोंदू बाबाने या पीडित कुटुंबीयाला खाजगी सावकारा कडून महिना नऊ टक्के व्याजाने तीन लाख रुपये कर्जाने पैसे मिळवून दिले.मात्र भोंदू बाबाने कोणतेही काम न करता फसवणूक केल्याचे लक्षात आल्याने पीडित महिलेने अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोळकर यांच्याशी संपर्क साधला असता दाभोलकरांनी शरतील कार्यकर्त्यांना संपर्क साधून पीडित महिलेने दिलेल्या तक्रारी वरून शांतीनगर पोलिस ठाण्यात हजरत बाबा उर्फ अमजद असद खान या विरोधात गुन्हा दाखल केला होता.

दुसऱ्या एका प्रकरणात पिंपळास गावातील स्मशानभूमीत अघोरी पूजा करणाऱ्या दोघां विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात ५ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.या दोघांनी गावातील स्मशानभूमीत दोन अनोळखी महिलांचे फोटो लिंबूवर चिटकवून ते लिंबू काळया कपडयामध्ये बांधून अनोळखी महीलांच्या जिवाला धोका व्हावा या उद्देशाने जादुटोणा करण्यासाठी लिंबू बांधलेला काळा कापड पिंपळास गावातील स्मशानभुमीमध्ये ठेवला होता. ही बाब गावातील काहींच्या नजरेत आल्याने गावाचे पोलिस पाटलांनी दोघांविरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

### शहरात आजही अनेक भोंदू बाबा सक्रिय

**भिवंडी शहरात आजही अनेक भोंदू बाबा सक्रिय असून आर्थिक तंगी, घरातील क्लेश, शारीरिक व्याधी यांच्यावर उपचार करण्याच्या बहाण्याने हजारो रुपये हे भोंदू बाबा नागरिकांकडून वसूल करत आहेत मात्र याबाबत कुणी स्पष्ट बोलत नसल्याने रात्रीच्या काळोखात हे भोंदू बाबा आपले कार्य उरकून घेतात.**

## व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा परिणाम

# सर्वसामान्यांच्या तोंडाला बसला चहाचा चटका; युद्धाच्या धगीने महागाईचा फटका थेट ग्राहकांपर्यंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : आंतरराष्ट्रीय तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता थेट कळंब शहरासह, ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर दिसू लागला असून, चहाच्या कपापासून ते पिण्याच्या पाण्याच्या बाटलीपर्यंत महागाईची झळ पोहोचली आहे. रोजच्या गरजेचा साधा चहा देखील आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या वाढीमुळे चहाचे हॉटेल, टपऱ्या आणि लहान व्यावसायिकांचे गणित पूर्णपणे बिघडले आहे. अनेक व्यापाऱ्यांना व्यावसायिक सिलेंडर सहज उपलब्ध होत नसल्याने अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. त्याचा थेट परिणाम ग्राहकांवर झाला असून, पूर्वी पाच रुपयांत मिळणारा चहा आता सात, दहा आणि काही ठिकाणी बारा रुपयांपर्यंत पोहचला आहे.

फक्त चहाच नव्हे तर प्लास्टिक साहित्य, पिण्याच्या पाण्याचे बॉक्स, बाटल्या आणि नामांकित ब्रँडचे पाणी देखील महाग झाले आहे. छोट्या व्यवसायिकांवर याचा मोठा आर्थिक ताण निर्माण झाला असून, ग्राहकांच्या खिशालाही मोठी कात्री लागली आहे.

युद्धामुळे इंधन, वाहतूक आणि कच्च्या मालाच्या खर्चात वाढ झाल्याने बाजारातील जवळपास सर्वच वस्तूंचे दर वाढत आहेत. परिणामी सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यापारी आणि हॉटेल व्यवसायिक अडचणीत सापडले आहेत.

महागाईचा हा वाढता भडका रोखण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

**महागाईचे कारण:**

- व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात वाढ
- इंधन, वाहतूक आणि कच्च्या मालाच्या खर्चात वाढ
- उत्पादनातील घट आणि मालाची कमी उपलब्धता

**महागाईचे परिणाम:**

- सर्वसामान्यांच्या जीवनमानावर परिणाम
- छोटे व्यापारी आणि हॉटेल व्यवसायिक अडचणीत
- ग्राहकांच्या खिशाला कात्री लागली आहे.सर्व सामान्य नागरिक हैराण...

**शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा.**

**- हनुमंत भाऊ पाटुळे (संस्थापक अध्यक्ष)**
**मानव अधिकार आंदोलन संघटना.**



## ‘पीएनजी’ क्षेत्रातील नागरिकांना ३० जूननंतर ‘एलपीजी’ गॅस पुरवठा बंद; पर्यायी इंधन म्हणून केरोसीनचे वाटप होणार

(पान १ वरून..) राज्यातील ३.५ कोटी एलपीजी ग्राहकांसाठी काही महत्त्वाचे नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार, गॅसचे समान वाटप व्हावे यासाठी 'बुकिंग इंटरव्हल' निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सुरक्षित वितरणासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (डीएसी) अनिवार्य करण्यात आला असून ८५ टक्के वितरण या प्रणालीद्वारे होत आहे. रुग्णालये आणि शिक्षण संस्थांना १०० टक्के इंधन पुरवठा केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार व्यावसायिक गॅसचे चार टप्प्यांत वाटप होत आहे. उद्योग क्षेत्राला बळकटी देण्यासाठी २७ मार्च २०२६ रोजी केंद्र सरकारने आणखी २० टक्के अतिरिक्त कोटा मंजूर केला आहे. या टप्प्यात प्रामुख्याने श्रमप्रधान उद्योगांना प्राधान्य देण्यात आले आहे. यात पोलाद आणि ऑटोमोबाईल, कापड उद्योग, रंग आणि रसायने, प्लास्टिक उद्योग या क्षेत्रांचा समावेश आहे. स्थलांतरित मजुरांसाठी ५ किलोच्या ‘एफटीएल’ सिलिंडरचेही वितरण सुरू आहे. इंधनाचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथके तैनात करण्यात आली आहेत. ६ एप्रिल २०२६ पर्यंत राज्यभरात १४ हजार ३२९ तपासण्या करण्यात आल्या असून, या कारवाईत ३ हजार ६२८ सिलिंडर आणि ७१ हजार ५६५ किलो गॅस जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी ५३ एफआयआर नोंदवण्यात आले असून ३६ जणांना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मालाची किंमत सुमारे २३.८५ कोटी रुपये आहे. केंद्र सरकारने राज्याला ३ हजार ७४४ किलोलीटर केरोसीन मंजूर केले असून, प्रति कुटुंब ३ लिटर केरोसीनचे वाटप स्वस्त धान्य दुकानांमार्फत केले जाईल. नागरिकांच्या तक्रारींसाठी ९७६९११९२२१ हा व्हॉट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे. चंद्रकांत डांगे यांची राज्यस्तरीय 'नोडल ऑफिसर' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.